कायम विनाअनुदान तत्वावर (22)

९५७०/१९

जा.क्र ऊमाशि – १/अति. शाखा/जा.तु./मान्यता/ काविअ/०९–१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – १
यांचे कार्यालय
दिनांक :– 19 JAN 2010

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक
वालचंद विद्यालय व क.म.वि.
कळंब, ता. इंदापूर, जि. पुणे

विषय :– कायम विनाअनुदानीत उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास इयत्ता ११ वी वर्गास शैक्षणिक वर्ष २००९–२०१० पासून नवीन/ अतिरिक्त शाखा /जादा तुकडी मंजूरीबाबत.

संदर्भ :– १) शासन पत्र क्र एच एस सी १७०८/(३९९/०९) उ मा शि – १ दि.०१.०८.२००९
२) मा. शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक यांचेकडील क्र एच. एस. सी. १५२००९ /जादा तुकड्या/१२ एच एस / ८३८१ दिनांक १८.०८.२००९ चे पत्र.
३) शिक्षण संचालनालयाचे सम क्रमांकाबाबत ९१२७ दिनांक १६.९.२००९ चे पत्र.
४) माध्यमिक शाळा संहिता जोडपत्र ७० मधील चार.
५) संचालनालयाचे पत्र क्र संकिर्ण / २००९ / ६४११६ / याचिका / १५क (८) / ९३४४ , दिनांक २४ सप्टेंबर २००९
६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे ---- यांचे क्र. ------ दिनांक --------- चे पत्र.

संदर्भीय शासन निर्णय, पत्र व नियमातील तरतुदीनुसार मिळालेल्या अधिकारान्वये, आपल्या उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास शासन निर्णय दिनांक २१.१२.२००० मधील आणि त्याशिवाय खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००९–२०१० पासून इयत्ता ११ वी वर्गासाठी कायम विनाअनुदान तत्वावर खाली नमूद केलेली / केलेल्या अतिरिक्त शाखा / जादा तुकडी / तुकड्या मंजूर करण्यात येत आहे / आहेत.

इयत्ता ११ वी

| अ.नं | माध्य व उच्च माध्य./ कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता | शाखा इ. ११ वी | तुकडी क्र | माध्यम | कायम विनाअनुदानित तत्वावर वर्ग मंजूरीचे वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | वालचंद वि व क. म. वि. कळंब ता. इंदापूर, जि. पुणे | कला | — | — | २००९–२०१० | कायम विनाअनुदानित तत्वावर वर्ग मान्यता |
| | | वाणिज्य | — | — | | |
| | | विज्ञान | प्रथम | — | | |
| | | संयुक्त | — | — | | |

अटी व शर्ती

१. जुलै/ ऑगस्ट मधील पटपडताळणीनंतर मान्य केलेल्या पटावर वरील तुकडी मंजूर केलेली आहे. मान्य पटापेक्षा कमी पट असल्यास / आढळल्यास सदर तुकडी रद्द होईल.

TRUE COPY

Received on 01-02-10

मुख्याध्यापक
वालचंद विद्यालय कळंब

प्राचार्य
वालचंद विद्यालय व ज्युनि.कॉलेज
कळंब ता.इंदापूर जि.पुणे

TRUE COPY
मुख्याध्यापक
वालचंद विद्यालय कळंब
ता.इंदापूर जि.पुणे ४१३११४

Scanned by CamScanner

२. सदर तुकडीचा आदेश प्राप्त होताच तुकडी / तुकड्या सुरु असल्याचा अहवाल हा मुख्याध्यापकाने / प्राचार्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठवावा. अन्यथा सदर तुकडी चालू नाही असे गृहीत धरुन ती अग्राह्य धरली जाईल. अशा अग्राह्य वर्ग/ तुकडीस आवश्यकता भासल्यास सदर वर्ग/तुकडीस पुनर्जीवीत करण्यासाठी विहित नमुन्यात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे मार्फत प्रस्ताव वर्ग/तुकडी सुरु केल्यानंतर एक महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करावा.

३. सदर तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांचे संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता विषयक प्रस्ताव तातडीने विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी जाहीर केलेल्या मान्यता शिबीरामध्ये दाखल करणे उच्च माध्यमिक शाळा / क.म.वि. यांचेवर बंधनकारक राहील. नियम बाह्य केलेल्या नियुक्त्यांना मान्यता दिल्या जाणार नाहीत.

४. पुढील शैक्षणिक वर्षी सदर वर्गाच्या तुकडीस निकषापेक्षा पट कमी झाल्यास ती तुकडी मुख्याध्यापकांनी / प्राचार्यांनी तात्काळ बंद झाल्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण उपसंचालक कार्यालयास तात्काळ कळवावे.

५. इयत्ता ११ वी चे उच्च माध्यमिकचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास ८० विद्यार्थ्यांची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेले असल्यास १२० विद्यार्थ्यांची एक तुकडी समजण्यात येईल.

६. सदर वर्गास शासनाची कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान किंवा कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही या अटीच्या अधिन राहून उपरोक्त वर्गास मान्यता देण्यात येत आहे.

७. शासनाने विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी ठरवून दिलेले शिक्षण शुल्क आकारणे संस्थेवर बंधनकारक राहिल.शासनाचे पूर्व परवानगी शिवाय कोणतेही जादा शुल्क आकारता येणार नाही.

८. जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/ ०४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

१. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२. कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत.

३. कनिष्ठ महाविद्यायाचा संबंधीत कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत सर्व दृष्टिकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री करण्यात यावी. तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

५. प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीचे सुरक्षिततेच्या दृष्टिने नियमित तापसणी करण्यात यावी. संबंधीत अधिकारी यांनी (National Building Code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी / कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

शिक्षणउपसंचालक
पुणे विभाग, पुणे – १

प्रत,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जि.प. पुणे / सोलापूर / अहमदनगर

TRUE COPY
मुख्याध्यापक
वालचंद विद्यालय कळंब
ता.इंदापूर जि.पुणे ४१३११४

Scanned by CamScanner

मुख्याध्यापक / प्राचार्य
वालचंद विद्यालय व ज्यु.क.वि.
कळंब ता. इंदापूर, जि- पुणे

विषय :- कायम विनाअनुदानीत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास शैक्षणिक
वर्ष २०१०–२०११ पासून इयत्ता १२ वी नैसर्गिक वाढ वर्ग मंजुरी.

संदर्भ :- १) शासन पत्र क्र एच एस सी १७०८/(१८१/०८) उ मा शी १ दि.१०.०७.२००८
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक उ मा शी १/ ११ वी नवीन मान्यता /दि. २१.०८.२००८
३) शिक्षण अधिकारी माध्य. जि.प. पुणे यांचे पत्र क्र. दि. १८/५/१०

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास शासन निर्णय दिनांक २१.१२.२००० मधील आणि त्याशिवाय खालील अटींच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०१०–२०११ पासून कायम विनाअनुदान तत्वावर खाली नमुद केलेली / केलेल्या नैसर्गिक वाढीने इ.१२ वी वर्गासाठी मंजुर करण्यात येत आहे / आहेत.

इयत्ता १२ वी

| अ.नं | माध्य व उच्च माध्य / कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता | शाखा इ. १२ वी | तुकडी क्र | माध्यम | कायम विनाअनुदानित तत्वावर वर्ग मंजुरीचे वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | वालचंद विद्यालय व क.म.वि. कळंब ता. इंदापूर जि- पुणे | कला | — | — | २०१०–२०११ | कायम विनाअनुदानित तत्वावर वर्ग मान्यता |
| | | वाणिज्य | — | — | | |
| | | विज्ञान | प्रथम | — | | |
| | | संयुक्त | | — | | |

अटी व शर्ती

१. जुलै/ ऑगस्ट मधील पटपडताळणीनंतर मान्य केलेल्या पटाच्या वरील तुकडी मंजुर केलेली आहे. मान्य पटापेक्षा कमी पट असल्यास / आढळल्यास सदर तुकडी नादेय राहील

२. सद. तुकडीचा आदेश प्राप्त होताच तुकडी / तुकड्या सुरु असल्याचा अहवाल हा मुख्याध्यापकाने / प्राचार्यांने शिक्षण अधिकारी / शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठवावा. अन्यथा सदर तुकडी चालू नाही असे गृहीत धरुन ती अग्राह्य धरली जाईल. अशा अग्राह्य वर्ग/ तुकडीस आवश्यकता भासल्यास सदर वर्ग/तुकडीस पुर्नजिवीतसाठी विहीत नमुन्यात शिक्षण अधिकारी माध्यमिक मार्फत प्रस्ताव या कार्यालयास सदर वर्ग/तुकडी सुरु केल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करावा.

३. सदर तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांचे संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता विषयक प्रस्ताव आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विभागीय शिक्षण उपसंचालक कळवतील त्या ठिकाणी शिबीरामध्ये दाखल करणे. उच्च माध्यमिक शाळा / क.म.वि. यांचेवर बंधनकारक राहील.

४. पुढील शैक्षणिक वर्षी सदर मंजुर तुकडी चालू राहणाऱ्या सदर वर्गाच्या तुकडीस निकषापेक्षा पट कमी झाल्यास ती तुकडी मुख्याध्यापकांनी / प्राचार्यांनी तात्काळ बंद झाल्याचे शिक्षण अधिकरी / शिक्षण उपसंचालक कार्यालयास कळवावे.

५. इयत्ता १२ वी चे उच्च माध्यमिकचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास ८० विद्यार्थीची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेले असल्यास १२० विद्यार्थीची एक तुकडी समजण्यात येईल.

६. सदर वर्गास शासनाची कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान किंवा कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही या अटीच्या अधिन राहून उपरोक्त वर्ग मान्यता देण्यात येत आहे.

७. शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्याकडून आकारणे संस्थेकडून बंधनकारक राहील.

TRUE COPY

प्राचार्य
वालचंद विद्यालय व ज्युनि.कॉलेज
कळंब ता.इंदापूर जि.पुणे

शिक्षणउपसंचालक

TRUE COPY

मुख्याध्यापक
वालचंद विद्यालय कळंब
ता.इंदापूर जि.पुणे ४१३११४

Scanned by CamScanner